# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**<u>अत्यंत तातडीचे/महत्वाचे</u>**

क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/३०७/२०२०
दिनांक : ६/१०/२०२०

प्रति,
प्राचार्य / विभागप्रमुख,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग.

**विषय : उन्हाळी-२०२० परीक्षा....**
**दिव्यांग विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत.**

संदर्भ : १) परिपत्रक क्रमांक संगाबाअवि-३/संपमूमं/ २७६ /२०२०, दिनांक १२.०९.२०२०
२) शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०१७

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, दिव्यांग विद्यार्थी जर आपल्या महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्रावर उन्हाळी-२०२० परीक्षेकरीता ऑफलाईन परीक्षा देण्याकरीता प्रवेशित असेल तर अशा दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी परीक्षेचा कालावधी हा दिड तासाऐवजी दोन तासांचा राहील. तसेच इतर सवलती उपरोक्त संदर्भान्वये त्यांना देण्यात याव्यात. सदर दिव्यांग विद्यार्थ्यांची ऑफलाईन परीक्षा झाल्यानंतर खाली दिलेल्या तक्त्यामध्ये महाविद्यालयांनी exam2020@sgbau.ac.in या अधिकृत मेलवर आवश्यक दस्ताऐवजांसह प्राचार्यांनी प्रमाणित करुन विद्यापीठाकडे पाठवावीत.

| अ.क्र. | दिव्यांग विद्यार्थ्यांचे नांव | परीक्षा क्रमांक | परीक्षेचे नांव | प्रवेशित असलेल्या विषयांची नांवे |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

दिव्यांग विद्यार्थी जर ऑनलाईन परीक्षा देत असेल तर त्यांचेकरीता परीक्षेचा कालावधी हा ९० मिनीटांचा राहील. परिपत्रक क्रमांक संगाबाअवि-३/संपमूमं/२७६/२०२०, दिनांक १२.०९.२०२० अन्वये दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता प्रश्नपत्रिकेतील एकुण प्रश्नांच्या ३३ टक्के बेस्ट प्रश्नांच्या उत्तरांना गुणदान करण्यासाठी विचारात घेतले जातील. त्याकरीता दिव्यांग विद्यार्थ्यांनी याबाबतची संपूर्ण माहिती आवश्यक दस्ताऐवजांसह त्यांचे महाविद्यालयांच्या प्राचार्यांना द्यावी. प्राचार्यांनी सदर माहिती परीक्षा संपल्यानंतर तीन दिवसांचे आंत जिल्हाशल्यचिकित्सकांच्या प्रमाणपत्रांसह प्रमाणित करुन exam2020@sgbau.ac.in या मेलवर न चुकता पाठवावी.

आपणाकडून सहकार्य अपेक्षित आहे.

धन्यवाद.

आपला,

(डॉ.हेमंत आर.देशमुख)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ